# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 22 October 2024

Time: 7.10 to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: २२ ऑक्टोबर २०२४ सकाळी ७.१० मि.**

********

*ठळक बातम्या*

- **विधानसभा निवडणुकीची अधिसूचना आज जारी होणार–राज्यभरात नामनिर्देशन प्रक्रियेला आजपासून प्रारंभ–महायुती तसंच महाविकास आघाडीचं जागावाटप अद्याप अस्पष्ट**
- **परिवर्तन महाशक्ती, मनसे, तसंच वंचित बहुजन आघाडीकडून उमेदवारांची टप्प्याटप्प्याने घोषणा**
- **भारत जोडो अभियानाचे संयोजक योगेंद्र यादव यांच्या अकोला इथल्या विचार सभेत गोंधळ**
- **राजकीय पक्षांनी दुष्काळमुक्त मराठवाड्याचं लेखी आश्वासन द्यावं–मराठवाडा पाणी परिषदेची मागणी**

**आणि**

- **भामरागड तालुक्यात पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत पाच नक्षलवादी ठार**

*सविस्तर बातम्या*

विधानसभा निवडणुकीसाठीची अधिसूचना आज जारी होत आहे. या पार्श्वभूमीवर राज्यभरात नामनिर्देशन प्रक्रियेला आजपासून प्रारंभ होत आहे. येत्या २९ तारखेपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येणार असून, ३० तारखेला अर्जांची छाननी होणार आहे. चार नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत. नांदेड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी याच वेळापत्रकाप्रमाणे नामनिर्देशन प्रक्रिया पार पडणार आहे.

सर्व ठिकाणी २० नोव्हेंबर रोजी मतदान आणि २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. २५ नोव्हेंबरपूर्वी ही सर्व प्रक्रिया पूर्ण होईल.

****

राज्यात आतापर्यंत नऊ कोटी ६३ लाखांहून अधिक मतदारांची नोंद झाली आहे. त्यात सुमारे एक कोटी ८५ लाख हे २० ते २९ वयोगटातले मतदार आहेत. २० लाख ९३ हजारांहून अधिक मतदारांनी यंदा पहिल्यांदाच मतदार यादीत नाव नोंदवलं आहे. कातकरी, कोलम, मारिया गोंड या आदिवासी जमातींमधल्या सर्व २ लाख ७७ हजार मतदारांची नोंद मतदार यादीत केल्याचं निवडणूक आयोगानं जाहीर केलं आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी एकूण एक लाख १८६ मतदार केंद्र असतील. त्यातले ४२ हजार ६०४ केंद्रं शहरी तर ५७ हजार ५८२ केंद्रं ग्रामीण भागात आहेत.

****

दरम्यान, निवडणूक निकालानंतर राज्यात राष्ट्रपती राजवट लागू होण्याची चर्चा निराधार असल्याचं मत राजकीय तज्ज्ञांनी व्यक्त केलं आहे. विद्यमान विधानसभेची मुदत संपण्यापूर्वी म्हणजेच २६ नोव्हेंबरपूर्वी निवडणूक आयोगाकडून निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होऊन नवनिर्वाचित आमदारांची यादी राज्यपालांकडे सादर केली जाईल, त्यानंतर राज्यघटनेच्या कलम १६४ नुसार सरकार स्थापनेसाठी राज्यपाल आमंत्रण देऊ शकतात आणि त्यासाठी २६ नोव्हेंबर या तारखेचं बंधन नाही, २६ नोव्हेंबरची कालमर्यादा फक्त निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी असल्याचं, तज्ज्ञांकडून सांगण्यात आलं.

****

राज्यात उमेदवारी अर्ज भरायला आजपासून सुरुवात होत असली, तरी महायुती तसंच महाविकास आघाडीतल्या घटकपक्षांचं जागावाटप अजून स्पष्ट झालेलं नाही. महायुतीत भाजपाचे ९९ उमेदवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे काही उमेदवार वगळता इतर उमेदवार जाहीर झालेले नाहीत.

दरम्यान, महाविकास आघाडीत कोणतेही मतभेद नसल्याचं, प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटलं आहे. ते काल दिल्लीत माध्यमांशी बोलत होते. जागा वाटपासंदर्भात काँग्रेसच्या ९६ जागांवरील चर्चा पूर्ण झाली असून, उर्वरित जागांवर घटकपक्षांसोबत आज चर्चा होईल, त्यानंतर आजच उमेदवारांची यादी जाहीर करण्याचा प्रयत्न असेल, असं पटोले यांनी सांगितलं. महाविकास आघाडीतून

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष बाहेर पडणार या बातमीत काहीही तथ्य नसल्याचं, पटोले यांनी स्पष्ट केलं.

****

रिपब्लीकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांनी आपल्या शिष्टमंडळासह काल भाजप नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत भेट घेतली. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन पक्षाला काही जागा सोडण्याबाबत यावेळी चर्चा झाली. याबाबत महायुतीच्या तीन मोठ्या घटकपक्षांसोबतच्या बैठकीत निर्णय घेण्यात येईल असं आश्वासन फडणवीस यांनी दिल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची पहिली यादी काल जाहीर केली. कल्याण ग्रामीण मतदारसंघातून राजू पाटील आणि ठाण्यातून अविनाश जाधव यांना उमेदवारी देण्यात आली आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी डोंबिवलीत राजू पाटील यांच्या निवडणूक मध्यवर्ती प्रचार कार्यालयाचं उद्घाटन केल्यानंतर ही माहिती दिली.

****

राज्यात नव्याने स्थापन झालेल्या परिवर्तन महाशक्ती या तिसऱ्या आघाडीने दहा उमेदवारांची पहिली यादी काल जाहीर केली. या दहापैकी आठ जागा प्रहार जनशक्ती पक्षाला, तर दोन जागा राजू शेट्टी यांच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेला देण्यात आल्या आहेत. राजू शेट्टी यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

*Byte…*

**परिवर्तन महाशक्तीच्या या यादीत मराठवाड्यात देगलूर-बिलोली मतदार संघातून सुभाष साबणे, हदगाव-हिमायतनगर-माधव देवसरकर, तर हिंगोली मतदार संघातून गोविंदराव भवर यांना उमेदवारी देण्यात आली आहे.**

**

**भारतीय कम्युनिस्ट पक्षानं छत्रपती संभाजीनगर इथल्या औरंगाबाद मध्य विधानसभा मतदार संघातून विधिज्ञ अभय टाकसाळ यांच्या उमेदवारीची घोषणा केली. पक्षाचे राष्ट्रीय सचिव डॉ. भालचंद्र**

**कांगो यांनी छत्रपती संभाजीनगर इथं ही माहिती दिली. भाकपने राज्यभरात अकरा जागा देण्याची मागणी महाविकास आघाडीकडे केली आहे. याबाबत महाविकास आघाडीशी चर्चा सुरू असून, येत्या दोन दिवसात अंतिम निर्णय झाल्यानंतर आपण अंतिम उमेदवारांची घोषणा करू असंही डॉ कांगो यांनी सांगितलं.**

**

**वंचित बहुजन आघाडीने १६ उमेदवारांची पाचवी यादी काल जाहीर केली. यामध्ये उदगीर मतदार संघातून प्राध्यापक डॉक्टर शिवाजीराव देवनाळे यांना उमेदवारी देण्यात आली आहे.**

****

भारत जोडो अभियानाचे संयोजक योगेंद्र यादव यांची काल अकोला इथं झालेली विचार सभा, वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी उधळून लावली. महाराष्ट्र डेमोक्रेटिक फोरम–लोकशाही मंच द्वारे घेण्यात आलेल्या या सभेत योगेंद्र यादव यांचं भाषण सुरू होताच, वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी काही प्रश्न उपस्थित केले. यावरून मोठा गोंधळ उडाला. दरम्यान, धक्काबुक्की झाल्यानं पोलिसांनी वंचितच्या काही कार्यकर्त्यांना ताब्यात घेतल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक लढवणाऱ्या सर्व राजकीय पक्षांनी आपल्या जाहीरनाम्यात दुष्काळमुक्त मराठवाड्याचं लेखी आश्वासन द्यावं, अशी मागणी मराठवाडा पाणी परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. मराठवाड्यातली सिंचन क्षमता ५० टक्क्यांन वाढवण्यासाठी एकात्मिक जलनिती या योजनेअंतर्गत सर्व पर्यायाचा विचार करून कालबद्ध कार्यक्रम राबवला जावा अशी अपेक्षा देखील मराठवाडा पाणी परिषदेने आपल्या प्रसिद्धी पत्रकात व्यक्त केली आहे.

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज ठाणे जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

राष्ट्रीय जल पुरस्कार आज नवी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान केले जाणार आहेत. केंद्रीय जलशक्ती मंत्रालयानं सर्वश्रेष्ठ राज्य, जिल्हा, ग्रामपंचायत, शहरी स्थानिक स्वराज्य संस्था, पाणी वापर समूह आणि सर्वश्रेष्ठ नागरिक, समाज अशा नऊ श्रेणींत ३८ विजेत्यांची घोषणा केली आहे. यंदा या पुरस्कारांचं हे पाचवं वर्ष आहे.

****

गडचिरोली जिल्ह्यातल्या भामरागड तालुक्यात पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत पाच नक्षलवादी ठार झाले. या चकमकीत एक पोलीस जखमी झाला असून, त्याच्यावर गडचिरोली इथल्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. विधानसभा निवडणुकीदरम्यान घातपाताचा कट रचण्यासाठी कोपर्शीच्या जंगलात नक्षलवादी एकत्र आल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार या भागात सी–६० पथकाच्या २२ तर केंद्रीय राखीव दलाच्या दोन तुकड्यांनी नक्षलविरोधी अभियान राबवलं. यादरम्यान झालेल्या चकमकीत पाच नक्षलवादी मारले गेले, त्यांची ओळख पटवणं सुरू आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या सोयगाव तालुक्यात काल दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये दोन जणांचा अंगावर वीज पडून मृत्यू झाला. जंगली कोटा इथला अजिनाथ नथू राठोड, हा १८ वर्षीय युवक तसंच मौजे हनुमंतखेडा इथली अश्विनी मच्छिंद्र राठोड, या १४ वर्षीय मुलीचा मृतांमध्ये समावेश आहे.

****

राज्यात विधानसभा निवडणूक आचारसंहिता लागू झाल्यापासून सी–व्हिजिल ॲपवर एकूण ७७६ तक्रारी प्राप्त झाल्या, त्यापैकी ७७३ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत. राज्याचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी यांनी ही माहिती दिली

****

शिक्षकांनी मतदार जनजागृती उपक्रमात योगदान देण्याचं आवाहन, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केलं आहे. मतदार जनजागृतीसाठी स्वीप उपक्रमाचा भाग म्हणून ते काल शिक्षक मेळाव्यात बोलत होते. एमआयटी महाविद्यालयातही स्वामी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून मतदान करण्याचं आवाहन

केलं. यावेळी विद्यार्थ्यांनी मतदार जनजागृतीपर भारुड तसंच गीतं सादर करुन उपस्थितांना मतदानाचं महत्त्व पटवून दिलं.

दरम्यान, जिल्ह्यातल्या नऊ विधानसभा मतदार संघात टपाली मतदान प्रक्रियेतल्या अधिकारी कर्मचाऱ्यांचं काल प्रशिक्षण काल पार पडलं. ८५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेले मतदार तसंच निवडणूक कर्तव्यावर असणारे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना टपाली मतदान प्रक्रियेची सुविधा सहज आणि सोपी पद्धतीने उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी यावेळी दिले.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येणारा विभागीय लोकशाही दिन, विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रद्द करण्यात आला आहे.

****

अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी सिद्धाराम सालीमठ तसंच जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी नेवासा इथल्या स्ट्राँगरूमला भेट देऊन तिथल्या व्यवस्थेचा आढावा घेतला. आचारसंहिता अंमलबजावणीच्या दृष्टीने त्यांनी यावेळी सूचना केल्या.

****